# ।। तत्त भेद को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ तत्त भेद को अंग लिखंते ।।

।। चोपाई ।।

**प्रम तत्त का जाणे भेव ।। सो जन साधु जुग में देव ।।**
**देव लोक सुं देवत आवे ।। प्रम तत्त सोई जन पावे ।।१।।**

जे साधु परमतत्तचा भेद जाणतात तेच जगात परात्परी परमात्मा अमरपुरुष देव आहे. अन्य सर्व साधु काळाचा चारा आहे.जे देवतांच्या लोकात देवतांचे सुख घेण्यात उदास राहतात,दु:खी राहतात,अतृप्त राहतात तसेच त्या सुखांमध्ये त्यांना ग्लानी येते असे जीव जेंव्हा देवता लोकातून मृत्युलोकात मनुष्य देहात जन्मतात तेव्हा विष्णूपर्यंतच्या सुखांच्या पलिकडील सुख शोधतात तेच साधु परमतत्त प्राप्त करतात. ।।१।।

**करमी जीव मिनष गत होई ।। प्रम तत्त नही पावे सोई ।।**
**रूप रेख देखण के मांई ।। दिष्ट मुष्ट मे आवे नाही ।।२।।**

कर्मी जीव म्हणजे नरकीय लोकातून नरकीय दु:ख भोगून जे जीव मनुष्य गतीत येतात ते कर्मी जीव पाच इंद्रियांचे व काम,क्रोध,लोभ,मोह,मत्सर,अहंकार या कर्मांमध्ये मन व पाच इंद्रियाकडून सुखांची तृप्ती करण्याची अभिलाषा ठेवतात ते जीव परमतत्त कधीही प्राप्त करीत नाही.त्या जीवाला परमतत्त सुख पाच इंद्रियांच्या सुखासारखे रुपरेषे मध्ये दिसण्यात येत नाही,म्हणजे त्याच्या दृष्टित येत नाही म्हणून त्याच्या मुठ्ठीत पकडले जात नाही म्हणजे समजमध्ये पकडले जात नाही.यामुळे कर्मी जीव या परमतत्तला पकडू शकत नाही.(प्राप्त करु शकत नाही) ।।२।।

**शब्द दिष्ट मे देख्यां जावे ।। से सबदां मे साध बतावे ।।**
**अन्छर मन्डे ना काना लागे ।। सो पद मिल्यां भ्रम सब भागे ।।३।।**

त्रिगुणी मायेचे साधु जे कागदावर लिहिले जाते,कानाने ऐकल्यानंतर समजण्यात येते अशा शब्दांचा वेद,शास्त्र,पुराण,कुराणचे ज्ञान सांगतात त्याने जीवांना पाच विषयांचे सुख मिळते.परंतु जीवांना हे पाच विषयांचे अतृप्त सुखांपासून जीवामध्ये परमसुख मिळेल किंवा नाही मिळणार हा भ्रम बनलेला असतो.तेच परमतत्तचे साधु परमतत्त ज्ञान सांगतात तो परमतत्तचा शब्द कागदावर बावन्न अक्षरांच्या समोर मांडला जात नाही व चक्ष कर्णानी तो सतशब्द ऐकला जात नाही असा परमतत्तचा शब्द घटात प्रगट झाल्यावर जीवाला महासुख प्राप्ती होण्याच्या प्रती(बाबत)एक भ्रम राहत नाही. सर्व मिटून जाते. ।।३।।

**भ्रम क्रम रेण नही पावे ।। ज्युं अगनी सब पूस जलावे ।।**
**बावण अखर जब लग जाणे ।। भ्रम क्रम कर बहोत बखाणे ।।४।।**

या परमतत्तच्या प्रतापाने जीवाचे भ्रम म्हणजे खोट्या त्रिगुणी मायेत तृप्त सुख समजणे

व कर्म म्हणजे विषयवासनेच्या कर्म क्रियांमध्ये हे साधु राहत नाही.जसे अग्नी कचरा जाळून राख करुन देते तसे परमतत्त भ्रम व कर्माला राख करुन देतात.बावन्न अक्षरांच्या ब्रम्हा, विष्णू,महादेव,शक्ती,अवतार इत्यादींच्या ज्ञानाच्या शरणात जोपर्यंत ज्ञानी,ध्यानी,साधु, नर–नारी राहतात.तो पर्यंत तृप्त सुख प्राप्त करण्याकरीता अनेक भ्रमीत म्हणजे खोटे उपाय व काळाच्या मुखातील कर्मकांड वाखाणतात. ।।४।।

**बावण अखर हे जुग माही ।। सातूं मात लगे ये नाही ।।**
**बावण अन्छर हे विस्तारा ।। पंन्डित पढ़े सकळ सब सारा ।।५।।**

सतशब्द हा बावन्न अक्षर व अक्षरांवर लागणाऱ्या सात मात्रांच्या पलिकडे आहे.कारण सतशब्दाला सातही मात्रा लागत नाही.जोपर्यंत शब्दाला साती मात्रा लागतात.तोपर्यंत शब्द बावन्न अक्षरांचे शब्द आहे.तो सतशब्द नाही.हे वेद,शास्त्र,पुराण हे बावन्न अक्षरांचा विस्तार आहे.हाच विस्तार सर्व पंडीत,ज्ञानी,ध्यानी वाचतात. ।।५।।

**बावण अन्छर सब कोई खोजे ।। प्रम तत्त कहूं नई सूजे ।।**
**पद बिन ग्यान सबे नर अंधा ।। उलटा पढया गलामे फंदा ।।६।।**

सर्व पंडीत,ज्ञानी,ध्यानी,नर–नारी बावन्न अक्षरात परमतत्तचे सुख शोधतात.बावन्न अक्षरात परमतत्तचे सुख नाही.त्याच्यात विषय वासनेचे सुख आहे.म्हणून ज्ञानी, ध्यानी,नर–नारी(स्त्री–पुरुष)ला परमतत्तचे सुख कसे असते हे समजत नाही.या कारणाने यांना परमतत्त शोधण्याचे सुचत नाही.या परमतत्तच्या ज्ञानाशिवाय सर्व अंधळे आहेत.परमतत्त शिवाय मायेच्या कर्म विधी केल्याने काळाचा फास जीवाच्या गळयात पडतो. ।।६।।

**मन सूं पवन सकल सूं न्यारा ।। सो पद लखे सन्त जन सारा ।।**
**पवना सूं न्यारा होई ।। पूरा सन्त लखे जन कोई ।।७।।**

हे परमतत्त मन व पवनपेक्षा वेगळे आहे.हे परमतत्त मन व श्वासाच्या क्रियेने प्राप्त केले जात नाही.म्हणून हे परमतत्त सर्व संत प्राप्त करीत नाही.हे पवन पेक्षा वेगळे परमतत्त जे पूर्ण संत आहेत तेच प्राप्त करतात. ।।७।।

**ग्यानी पन्डित पढ पढ भरमाना ।। प्रम तत्त का म्रम न जाणा ।।**
**पढ पढ ग्यान बतावे सोई ।। आपन समझे भूला दोई ।।८।।**

ज्ञानी,पंडीत,वेद,शास्त्र,पुराण वाचून–वाचून(शिकून–शिकून)त्रिगुणी मायेच्या सुखात भ्रमित होवून गेले.यांनी परमतत्तचे मर्म जाणले नाही.हे ज्ञानी पंडीत वाचून–वाचून वेद,पुराणाचे ज्ञान सांगतात.यांना त्रिगुणी मायेच्या सुखात काळ कसा आहे हे समजत नाही.म्हणून हे स्वतःही परमतत्तच्या सुखाला भुलून गेले व जगत ही यांच्यासोबत राहून परमतत्तचे सुख भूलून गेला. ।।८।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

प्रम तत्त कूं सार बतावे ।। सो पद छांड़ आन कूं स्यावे ।।
पंडित का कहा कहिये ग्याना ।। छाड़ पेड़ डाळा कूं जाणा ।।९।।

हे ज्ञानी,ध्यानी परमपद सार आहे.असे सांगतात.परंतु परमपद सोडून काळाच्या माया पदाला पकडतात.पंडीतांच्या ज्ञानाला काय म्हणावे हे झाडाच्या मुळांना सोडून फांद्या आणि ड्हाळ्या पकडतात. ।।९।।

पढ पढ बेद जन्म यूं जाई ।। प्रम तत्त वे लखे न भाई ।।
उद बुद कंवळां कहां लग भाखूं ।। द्रब दिष्ट की देखू आँखू ।।१०।।

या पंडीतांचे वेद,पुराण,वाचून वाचून जन्म असाच व्यर्थ जातो.हे परमतत्त कधी ही प्राप्त करीत नाही.जे मी अद्‌भूत परमतत्त दिव्य दृष्टीने घटात पाहतो ते यांना कोठपर्यंत व कसे समजावू? ।।१०।।

सुणता मरम भ्रम सब जावे ।। ज्यूं प्यासे कूं नीर पिलावे ।।
बिन समज्या पीवे नही कोइ ।। कहा कहूँ इचरज ओ होई ।।११।।

ह्या परमतत्तचे मर्म ऐकताच जीवाचे भ्रम मिटून जातात.जसे तहानलेल्याला पाणी पाजताच त्याची तहान मिटून जाते.तसे परमतत्त समजताच भ्रम मिटून जातात.मग भ्रम कधी ही उपजत नाही.परंतु तहान मिटविण्याकरीता पाणी प्यावे लागते हे समजत नाही.म्हणून वेद, शास्त्र,पुराणाच्या करण्यांच्या भ्रमात तृप्त सुख शोधत पंडीत पडलेले राहतात.तहानलेल्याची पाण्याने तहान मिटते हे जसे तो समजत नाही याचे जसे जगाला आश्चर्य होते तसे परमतत्तच्या भ्रम मिटतात.हे पंडीतांना समजत नाही.याच परमतत्तच्या संतांना आश्चर्य होते. ।।११।।

नारी पुरष गम अेक ठामा ।। बिन शब्दा नही परस्या जामा ।।
प्रम तत्त यूं सब मे होई ।। सतगुरू बिना लखे नही कोई ।।१२।।

सर्व स्त्री–पुरुषांच्या देहात परमतत्त एक सारखा ओतप्रोत आहे हे सतगुरु शिवाय समजत नाही.सतगुरु मिळाल्यावरच परमतत्त सर्व स्त्री–पुरुषांमध्ये आदीपासूनच ओतप्रोत आहे हे समजतात. ।।१२।।

गुरू किरपा कर हम कूं दीया ।। सिष आधीन बहोत होय लीया ।।
जुग मे हम लीया अवतारा ।। प्रम तत्त का करूं पसारा ।।१३।।

मी सतगुरुंच्या खुप आधीन होवून मी सतगुरुंची कृपा मिळवली.तेव्हा माझ्यावर गुरुने कृपा केली.मला जगात मनुष्य अवतार मिळाला व सोबत सतगुरुंचे परमतत्त मिळाले. आता मी परमतत्ताचा भेदाचा जगात प्रसार करेल. ।।१३।।

मेरा शब्द अगम की बाणी ।। समजा हंस मिलेगा आणी ।।
तत्त शब्द हम जब ही पाया ।। गुरू किरपा सुं भेव लखाया ।।१४।।

माझे शब्द,माझी वाणी अगम म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेव जाणत नाही अशा देशाची वाणी आहे.जे माझी वाणी समजतील ते माझ्या जवळ येतील.या तत्त शब्दाचा भेद मला गुरु कृपेने समजला तेव्हा परमतत्त घटात प्राप्त केले. ।।।१४।।

**आतम मध अगाध ज्युं बाणी ।। समज्या हंस मिलेगा आंणी ।।**
**प्रथम रसणा जब लिव लागे ।। भागे भ्रम आतमा जागे ।।१५।।**

आत्म्यात परमात्मा आहे.त्या परमात्म्याची अगाध वाणी आहे व अगाध वाणी जो समजेल तोच माझ्यात येवून मिळेल.प्रथम रसनेने लीव लागते.आत्मा जागृत होते व भ्रम सर्व पळून जातात.।।१५।।

**बेधे मूळ सूरत घर लावे ।। मन पवना के गांठ घुळावे ।।**
**मन सो पवन मिले घर आई ।। नख चख रूम लखे सब माई ।।१६।।**

मूळ शब्दाला शोधून सुरत नाभी घरी येते.मन व श्वास एकाच घरात येवून एक होवून मिळतात.व शब्द नखापासून चखापर्यंत रोमा रोमात माहित पडतो. ।।१६।।

**रसणा डोर लगे एक धारा ।। नाभ कवळ मे करे पसारा ।।**
**निस दिस रटे एक मन होई ।। कंठ कवळ छेदे जन सोइ ।।१७।।**

एक धार रसना चालते ती रसना शब्दाच्या नाभी कमळात पसारा करते.सर्व रात्रंदिवस एक मनाने रटन करतात.तेव्हा संत कंठ कमळाचे छेदन करतो. ।।१७।

**मुख मिश्री मन माहे लखावे ।। ज्यूं ज्युं रटे मन घर आवे ।।**
**सो गुरूदेवजी भेद बताया ।। जो कुछ दिष्ट मुष्ट मे आया ।।१८।।**

मनाला खडीसाखरे सारखे सुख मुखात येते.जसे जसे रटतो तसे मन घरात सुख येते.जो गुरुदेवजींनी भेद सांगितला तो सर्व मला दृष्टीने दिसला. ।।१८।।

**गद गद बाणी हुवे प्रकासा ।। कंठ कवळ ज्यां जीव निवासा ।।**
**कंठ कवळ दळ च्यारज कहिये ।। जीव पुरष का बासा लहिये ।।१९।।**

गदगद वाणी होवून प्रकाश झाला.कंठकमळात जीव बसलेला दिसला.कंठात चार पाकळीचे कमळ आहे.त्या चार पाकळीच्या कमळात जीवाचा राहण्याचा वास(स्थान) आहे. ।।१९।।

**सो हम भळे देखिया भाई ।। जीव जुगत कर बेठा मांई ।।**
**पाँचू साव प्रख ले सोई ।। जिभ्या स्वाद कंवल मुख होई ।।२०।।**

ते स्थान आम्ही पाहिले तेथे जीव युक्तीने बसला आहे.तेथे तो जे खातो त्याचे तऱ्हेतऱ्हेचे सर्व स्वाद जीभेने घेतो. ।।२०।।

**सब रस स्वाद जीव रस लेवे ।। आप अघाय पांच कूं देवे ।।**
**पाँचू पोख मिले ज्यां त्यांही ।। पच पच मरे जीतसी नाई ।।२१।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सर्व स्वाद जीव घेतो.प्रथम जीव घेतो व मग सर्व पाच आत्म्यांना देतो. ।।२१।।

पांख पांख मे बिंवरो भाई ।। बिष कूं छाड़ अमीरस खाई ।।
कहो इम्रत क्या कहिये सोई ।। ता का भेव बताओ मोई ।।२२।।

विषय रसांना त्यागून अमृत खातो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले अमृत काय आहे याचा भेद मी तुम्हाला सांगतो. ।।२२।।

साधाँ संग ग्यान सुण लीजे ।। इम्रत नांव निसोदिन पीजे ।।
संगत इम्रत ग्यान बिचाऱ्या ।। अनंत कोट साधु जन ताऱ्यां ।।२३।।

साधुच्या संगतीत ज्ञान ऐकेल व नामरुपी अमृत प्रत्येक क्षणात प्या.संतसंगत म्हणजे साधुंचे ज्ञान हेच अमृत आहे.याच अमृताने करोडो साधु जन भवसागरातून तरले. ।।२३।।

ग्यान बमेख बुध तब आवे ।। सत संगत गुरूदेव मिलावे ।।
संगत कर गुरूदेवजी पावे ।। गुरू समरथ गोवींद मिलावे ।।२४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्ञान विवेक बुध्दी तेव्हा येते.जेव्हा गुरुदेवांची संगत मिळते.गुरुदेवांची संगत करुन समर्थ गुरुदेव गोंविदाला मिळवून देतात. ।।२४।।

सत संगत सब मे सिर धारा ।। खान पान बिसरावत सारा ।।
पांचू अंग पलटे सोइ ।। निसदिन जे सत संगत होई ।।२५।।

सत संगत सर्व मायेच्या संगतीत श्रेष्ठ संगत आहे.ही जगाचे सर्व खाणे पिण्याचे सर्व स्वाद भुलवून मिळते.दररोज जे संगत करतात त्यांचे पाच विषय विकारांचे अंग संगत बदलून देते. ।।२५।।

संगत मुक्त मोख की दाता ।। माया जाल मिटे सब ताता ।।
सो संगत वो केसी कु वावे ।। माया टळे ब्रम्ह बर पावे ।।२६।।

सत संगत ही परममुक्ती,मोक्षाची दाता आहे.याच्याने माया जाळ सर्व मिटून जातो. याच्याने माया टळते व ब्रम्ह पती मिळतो.ही संगत सत संगत आहे बाकी संगत सत संगत नाही. ।।२६।।

संगत जुग मे बोहली कहिये ।। चोर जार साहा पन्डित लहिये ।।
च्यारूं संगत अे जुग लहिये ।। इन च्यारूं सुं वा न्यारी कहिये ।।२७।।

जगात संगत खुप प्रकारची आहे.चोर व्यभीचारी,साहुकार,पंडीत असे निच उच्च मोठा मोठी चार प्रकारची संगत जगात आहे.या चारी संगत पेक्षा सत संगत वेगळी आहे. ।।२७।।

निस दिन रहे मगन मन माता ।। नेह चल चित्त काहुं नही जाता ।।

केणी नही सुणी नेह आवे ।। सो सबदां कर साध बतावे ।।२८।।

त्या संगतमध्ये मन प्रत्येक पळात(क्षणात)सुखात मग्न राहते व चित्त निश्चल असते. विषय वासनेत फिरत नाही.ही गोष्ट सांगण्याने किंवा ऐकल्याने समजत नाही ही गोष्ट होण्याने समजते.ही गोष्ट ज्या साधुला झाली तेच शब्दात सांगू शकतात. ।।२८।।

पन्डित लखे न ग्यानी कोई ।। पढ़ पढ़ जन्म बिगोवे दोई ।।
मतवादी मत कूं नित ठाणे ।। प्रम तत्त का मरम न जाने ।।२९।।

या सुखाला पंडीत तसेच ज्ञानी ही समजू शकत नाही.हे पंडीत,ज्ञानी,पुराण वाचून–वाचून जन्म बिघडवून देतात.तसेच जे मतवादी असतात.ते आपल्या मतातच मग्न राहतात.ते ही परमतत्तचे मर्म कधी जाणत नाही. ।।२९।।

।। इति तत्त भेद को अंग संपूरण ।।